अस्मिता योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महिला व जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन्सचा पुरवठा करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः अस्मिता २०१८/ प्र. क्र. ३३/ योजना - ३
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
तारीख: ०१ मार्च, २०१८.

प्रस्तावना -

राज्यातील ग्रामीण भागातील महिला व किशोरवयीन मुली तसेच जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ या वयोगटातील किशोरवयीन मुलींमध्ये सॅनिटरी नॅपकिन व वैयक्तिक स्वच्छतेसंदर्भात जाणीव जागृती करणे व त्यांना माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करुन देण्याकरीता राज्यात "अस्मिता योजना" राबविण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे.

२. उमेद अभियानांतर्गत स्थापन झालेल्या स्वयंसहायता समूह यांच्यामार्फत ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदपुरस्कृत स्वयंसहायता समूह यांच्यासाठी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

परिपत्रक -

अस्मिता योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.:-

अस्मिता योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना व अस्मिता कार्डधारक जिल्हा परिषद शाळेतील मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिनची खरेदी व विक्री किंमत खालीलप्रमाणे राहील.:-

अ.क्र.	लाभार्थी	सॅनिटरी नॅपकिनचा आकार	८ पॅडच्या एका पॅकेटची स्वयंसहायता समूहांसाठी खरेदी किंमत	स्वयंसहायता समूहाचा हाताळणी खर्च / नफा	विक्री किंमत
१	२	३	४	५	६
१	ग्रामीण भागातील महिला	२४० मी.मी.	रु. १९.२०/-	रु. ४.८०/-	रु. २४/-
२	ग्रामीण भागातील महिला	२८० मी.मी.	रु. २३.२०/-	रु. ५.८०/-	रु. २९/-

अ.क्र.	लाभार्थी	सॅनिटरी नॅपकिनचा आकार	८ पॅडच्या एका पॅकेटची स्वयंसहायता समूहांसाठी खरेदी किंमत	स्वयंसहायता समूहाचा हाताळणी खर्च / नफा	विक्री किंमत
३	जिल्हा परिषद शाळेतील ११-१९ या वयोगटातील किशोरवयीन मुली	२४० मी.मी.	रु. ४/-	रु. १/-	रु. ५/-

३. या योजनेंतर्गत उमेदपुरस्कृत स्वयंसहायता समूहाची (SHG) सॅनिटरी नॅपकिनची मागणी नोंदविण्यासाठी व त्याचा पुरवठा करण्यासाठी "अस्मिता" (ASMITA) या नावाच्या स्वतंत्र मोबाईल ॲपचा वापर करावा.

४. स्वयंसहायता समूह यांनी अनुसरण्याची पद्धत:-

"उमेद" संस्थेमार्फत अंमलबजावणी करताना स्वयंसहायता समूहातर्फे सॅनिटरी नॅपकिन वितरणाची व्यवस्था खालीलप्रमाणे राहील:-

अ) नोंदणी प्रक्रिया:-

i) स्वयंसहायता समूह यांनी नोंदणीसाठी सर्वप्रथम Play Store वरुन ASMITA App Download करावे.

ii) त्यानंतर स्वयंसहायता समूहाने App वर NIC कोड टाकावा त्यानंतर नोंदणीसाठी आवश्यक असलेला OTP स्वयंसहायता समूहाच्या नोंदणीकृत मोबाईलवर येईल व नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल.

iii) जर एखाद्या स्वयंसहायता समूहाचा मोबाईल क्रमांक NIC च्या SHG Portal वर नोंदणीकृत नसेल तर त्या स्वयंसहायता समूहाला Asmita App वर नोंदणी करणे शक्य होणार नाही. त्यांनी NIC च्या SHG Portal वर त्यांच्या मोबाईल क्रमांकाची प्रथम नोंदणी करणे आवश्यक राहील.

ब) सॅनिटरी नॅपकिनची ऑनलाईन मागणी नोंदविणे:-

i) स्वयंसहायता समूहांनी नॅपकिनची मागणी ॲपवर नोंदवावी. ही मागणी करताना Asmita App मध्ये असलेल्या वॉलेटमध्ये पुरेशी रक्कम असणे आवश्यक आहे. यासाठी स्वयंसहायता समूहांनी वेळोवेळी या वॉलेटमध्ये पुरेशी रक्कम रिचार्ज करणे आवश्यक

आहे. हा रिचार्ज कोणत्याही आपले सरकार सेवा केंद्रात करता येईल किंवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, रुपे कार्ड इत्यादीचा वापर करुन करता येईल.

ii) सदर मागणी नोंदविताना प्रत्येक प्रकारच्या नॅपकिनची १४० पॅकेटच्या पटीत मागणी नोंदविणे आवश्यक आहे. (उदा. ग्रामीण भागातील महिलांसाठी २४० मी.मी. चे किमान १४० पॅकेट किंवा २८० मी.मी. चे किमान १४० पॅकेट किंवा किशोरवयीन मुलींसाठी २४० मी.मी. चे किमान १४० पॅकेट ची मागणी नोंदवावी).

क) सदर मागणी नोंदविल्यानंतर त्याचा एक SMS नोंदविलेल्या मोबाईलवर येईल व नॅपकिनच्या किंमतीची रक्कम वॉलेटमधून वजा होऊन Pool Account मध्ये जमा होईल. तालुका पातळीवरील वितरकाकडून हे नॅपकिन संबंधित स्वयंसहायता समूह प्राप्त करुन घेतील व Asmita App वर नॅपकिन प्राप्त झाल्याबद्दलची नोंद करतील. त्यानंतरच Pool Account मधील रक्कम आपोआप पुरवठादाराकडे वर्ग होतील.

५. जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ या वयोटातील किशोरवयीन मुलींसाठी अस्मिता योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची कार्यवाही.:-

१.जिल्हा परिषद शाळांमधील किशोरवयीन मुलींसाठी ही योजना अनुदान तत्वावर राबविण्यात येणार असून त्यांना ८ नॅपकिन्सचे एक पॅकेट रु. ५/- या सवलतीच्या दराने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२. यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद शाळांमधील मुलींकडे अस्मिता कार्ड असणे आवश्यक आहे. याकरीता जिल्हा परिषदशाळेमध्ये नोंदविलेल्या ११ ते १९ वयोगटातील सर्व मुलींच्या यादीची प्रमाणित प्रत मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीने ग्रामपंचायतीच्या आपले सरकार सेवा केंद्रात (ASSK) प्रत्येक शाळेने जमा करावी.

३. शाळेतील सर्व पात्र मुलींची नोंदणी आपले सेवा केंद्राच्या केंद्र प्रमुखांनी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये जाऊन करावी. याकरीता मुलींकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये. याकरीता प्रत्येक मुलीच्या नोंदणीकरीता रु. ५/- प्रमाणे नोंदणी फी शासनाकडून अदा करण्यात येईल.

४. नोंदणी झालेल्या सर्व मुलींसाठी Yes Bank मार्फत अस्मिता कार्ड तयार करण्यात येतील व उमेदमार्फत जिल्हा परिषद शाळेत पोहोचविण्यात येतील.

५. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक शाळेने १००% पात्र मुलींची नोंदणी करावी.

६. अस्मिता कार्ड मिळाल्यानंतर स्वयंसहायता समूहांकडून मुलींनी रु. ५/- या किंमतीत सॅनिटरी नॅपकिन विकत घ्यावे. विकत घेताना अस्मिता कार्ड दाखविणे गरजेचे राहील व या कार्डावरचा QR कोड read केल्याशिवाय स्वयंसहायता समूहांमार्फत ही विक्री होणार नाही.

६. विक्री प्रक्रिया :-

i) गावातील महिलांसाठी स्वयंसहायता समूहांनी केलेल्या मागणीप्रमाणे वरील नमूद (रु. २४/- व रु. २९/-) किंमतीत विक्री करावी. कोणत्याही परिस्थितीत ८ नॅपकिन्सचे संपूर्ण पॅकेटच विकावे सुटे नॅपकिन्स विकू नयेत.

ii) जिल्हा परिषदेत शाळेतील मुलींना विक्री करताना त्यांच्या अस्मिता कार्डवर असलेले QR कोड स्वयंसहायता समूहांनी त्यांच्या Asmita App मधुन read करुन विकणे योग्य राहील. जेणेकरुन संगणकामध्ये आपोआप योग्य लाभार्थ्याला विक्री करण्यात आलेली आहे याची नोंद घेण्यात येईल. जर अस्मिता कार्डवरचा QR कोड अनुदानित दराचे (रु.५/-) नॅपकिन विक्री करताना read करण्यात आला नाही तर संगणकीय प्रणालीमध्ये हे नॅपकिन स्वयंसहायता समूहाकडे प्रलंबित दिसतील व त्यांना हा साठा उपलब्ध असताना या दराच्या नॅपकिनसाठी नवीन मागणी करता येणार नाही. तसेच QR कोड read केल्यावर योग्य लाभार्थीकडे नॅपकिन पोहोचल्याची खात्री पटल्यानंतरच शासकीय अनुदान वितरीत करता येईल.

७. प्रशिक्षण कार्यपद्धती :-

गावपातळीवर अस्मिता योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी खालील दोन विषयावर प्रशिक्षणे द्यावीत.:-

१. अस्मिता ॲपचा वापर कसा करावा.

२. मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन (Menstrual Health Management).

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३०११३३४२७२९२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2018.03.03 12:28:04 +05'30'

(अनिल काळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. मा. विधानसभा व विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई.

६. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षण), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई / नागपूर.

८. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१०.मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, (सर्व).

११.विभागीय आयुक्त (सर्व).

१२.जिल्हाधिकारी (सर्व).

१३.जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.

१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान बेलापूर, नवी मुंबई.

१५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

१६.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत), जिल्हा परिषद, सर्व.

१७.शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

१८. ग्रामविकास व जलसंधारण विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

१९.उप सचिव, नियोजन (का.१४११ व १४१४) मंत्रालय, मुंबई.

२०.वित्त विभाग (का.व्यय-१५ व अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.

२१.उपायुक्त (विकास), सर्व, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.

२२.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व

२३.अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.

२४.निवडनस्ती (कार्यासन योजना - ३).